# विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१४ पुणे यांचे कार्यालय

---

## भूमि संपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा १) चे कलम ९ पोटकलम १ व २ अन्वये प्रसिध्द करावयाचे "प्रकटपत्र "

**विषय :- लोणावळा नगरपालिकेच्या मंजूर (दुसरी सुधारित ) विकास योजनेतील मौजे खंडाळा, तालुका मावळ, जिल्हा पुणे येथिल "आ.क्र.५, माध्यमिक शाळा विस्तार" यासाठी भूसंपादन**

यावरुन जाहीररित्या जाणिव देण्यात येत आहे की, सन १८९४ च्या भूमि संपादन अधिनियमान्वये दि.डिसेंबर २६- २०१३ ते जानेवारी १- २०१४ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात पृष्ठ क्र.९७ वर प्रसिध्द झालेली अधिसूचना क्र.पीएलबी-२/कावि/५२०/२०१३, दि.१९ डिसेंबर २०१३ यास अनुसरुन सन १८९४ चा भूसंपादन अधिनियम (१८९४ चा १) अन्वये मौ.खंडाळा, ता.मावळ, जि.पुणे येथिल खालील अनुसुचित नमूदनुसार व नुकतीच निशाणी केलेली त्यावर असलेली इमारत, झाडे, झुडपे वगैरेसह मोजलेली ७५०० चौ.मी. किंवा त्याहून अधिक किंवा कमी क्षेत्राची जमीन शासनाकडून लवकरच लोणावळा नगरपालिकेच्या मंजूर (दुसरी सुधारित) विकास योजनेतील "आरक्षण क्रमांक ५, माध्यमिक शाळा विस्तार " या सार्वजनिक प्रयोजनाकरिता संपादन करुन ताब्यात घेण्याचे शासनाद्वारे ठरले आहे.

तरी सदरहू जमीनीत हितसंबंध असलेल्या इसमांस यावरुन कळविण्यात येते की, त्यांनी जिल्हा परिषद जुनी इमारत, तिसरा मजला, पुणे -१ येथे खाली स्वाक्षरी करणार यांच्या कार्यालयात दि.३० जून २०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता जातीने अगर योग्य त्या मुखत्यारामार्फत हजर राहून सदरहू जमिनीत आपआपल्या हितसंबंधाचा प्रकार, यासंबंधी मोबदल्याच्या रकमेचा तपशिल व सदरहू अधिनियमाचे कलम ८ अन्वये जागेच्या मोजणी संबंधी काही हरकती असल्यास त्यांची संपूर्ण तपशीलवार माहिती आवश्यक त्या कागदपत्रांसह दयावी.

अनुसूची

**मौजे - खंडाळा** **तालुका - मावळ** **जिल्हा - पुणे**

| अ.क्र. | सि.स.नं. | आवश्यक असलेल्या जमीनीचे क्षेत्रफळ (चौ.मी.) | चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | उत्तरेस सि.स.नं. | दक्षिणेस सि.स.नं. | पूर्वेस सि.स.नं. | पश्चिमेस सि.स.नं. |
| १ | ४४ पैकी | ४१५० | ३८ | ४७ | ४४ | ४३ |
| २ | ४७ पैकी | ३३५० | ४४ | ४७ | ४७ | ४३ |
| एकूण - | | ७५०० | | | | |

जा.क्र.एलएक्यू.१५५/मौ.खंडाळा/ /२०१६
जिल्हा परिषद, जुनी इमारत,
३ रा मजला, पुणे - ४११००१.
दि. /०५/२०१६

(प्र.ग. नाळे)
विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१४ पुणे

कृपया मागे पहा....



F/Varun Shinde/Gokhale/LAQ 155 Khandala